REVIEW OF RESEARCH

# ग्रामीण कांदबरीतील बदलते समाजवास्तव

प्रा. डॉ. दत्तात्रय बारबोले

मराठी विभाग प्रमुख, शंकरराव मोहिते महाविद्यालय, अकलूज.

ISSN: 2249-894X
IMPACT FACTOR : 5.7631(UIF)
UGC APPROVED JOURNAL NO. 48514
VOLUME - 8 | ISSUE - 8 | MAY - 2019



## प्रस्तावना :—

निबंधवाचन करीत असताना प्रथम काही बाबी स्पष्ट करतो. पहिले म्हणजे, साहित्य समाजाचा आरसा आहे हे एक अर्धसत्य असल्याचे सगळ्यांना माहित आहे. त्याचप्रमाणे साहित्यातील वास्तव हेही एक अर्धसत्य असते. कारण, समकालीन वास्तवातील किती घटनांना लेखक प्रतिसाद देतो? हा एक मूलभूत प्रश्न आहे. लेखकाचा दृष्टीकोण, त्याचा प्रदेश, त्याचे आस्थाविषय असे कितीतरी घटक साहित्यातील वास्तव ठरवतात. म्हणून जेव्हा साहित्यातील वास्तव्याचा शोध घेतला जातो त्यावेळी वास्तव याचा अर्थ नेमकेपणाने लक्षात घेतला पाहिजे.

इथे १९८० अशी कालमर्यादा दिली आहे. त्यामागे काही भूमिका असावी. पण मी माझ्या शोधनिबंधापुरती ही कालमर्यादा १९९० अशी करुन घेतली आहे. त्यामागील कारणे मी स्पष्ट करणार आहे. तिसरी बाब म्हणजे या चर्चासत्रात जवळपास पंचवीस वर्षाच्या कालपटातील ग्रामीण साहित्याचा विचार होणार आहे. एक व्यापक विषय माझ्या विवेचनाच्या सोयीसाठी कादंबरीपुरता मर्यादित केला आहे. त्यातही माझ्या पहाण्यात आलेल्या कादंबऱ्यांचा विचार केला आहे. तो समग्र आहे असे मी स्वत: म्हणणार नाही. म्हणून प्रस्तुत निबंधातून १९९० नंतरच्या कादंबरीतील वास्तवाचा एक आराखडा मांडला आहे.

## सन १९९० कालमर्यादा - पार्श्वभूमी

१९९० नंतरच्या काळातील समाजजीवनात घडलेल्या ठळक बाबी विचारात घेतल्या तर असे दिसते की, १९८० मध्ये शरद जोशी यांनी भारताची इंडिया आणि भारत अशा दोन गटात वर्गीकरण केले होते. १९९१ मध्ये खुल्या आर्थिक धोरणाची घोषणा झाली. यानंतरच्या काळात आर्थिक उदारीकरणाची सुरवात झाली. या कळात अनेक प्रश्न निर्माण झाले. त्यांना उत्तरे शोधली गेली. जागतिकीकरण, माध्यमक्रांती यांचा बोलबाला सुरु झाला. यातून अनेक विरोधाभास दिसू लागले. चंगळवादी दृष्टीकोणाचा प्रभाव पडू लागला. त्याचवेळी शेतकऱ्यांच्या आत्महत्या होऊ लागल्या. अनेक आंदोलने निर्माण झाली. सेझ, नॅनो आदींना विरोध केला गेला. हा विरोध म्हणजे विकासाला विरोध असे मानले गेले त्याचवेळी सामाजिक कष्टकरी चळवळी हताश होऊ लागल्या. यातून शहरी, भांडवलशाही इंडीया विरुध्द ग्रामीण भारत असे चित्र पुढे यायला लागले. रा. ग. जाधव या काळाचे वर्णन करताना म्हणतात आपल्या जवळ चार भारत आहेत. एक म्हणजे बहिष्कृत भारत, दुसरा ग्रामीण भारत, तिसरा इंडीया हा आधुनिकीकरण झालेला भारत आणि चौथा रोमॅंटिक भारत एकदा हे लक्षात घेतले की, १९८० पेक्षा १९९० पासून वेगळा विचार करणे अधिक योग्य होईल. कारण १९९१ मधील खुल्या आर्थिक धोरणाची घोषणा ही एक महत्त्वाची घटना आहे. या घटनेचे दूरगामी परीणाम झालेले दिसतात, म्हणून १९९० पासूनचा कालखंड वेगळा कल्पिने अधिक श्रेयस्कर होईल.

ादंबरीचा अभ्यास करीत असताना तिचा काळ, त्यातील विशिष्ट समाजजीवन, लेखकाचे व्यक्तिमत्त्व, त्याच्या लेखनामागील प्रेरणा आणि प्रवृत्ती, वैशिष्ट्ये यांचा व्यवस्थितपणे विचार करावा लागतो. कादंबरीचे असे कालिक वर्गीकरण हे अभ्यास, व्यवस्थेसाठी एका मर्यादेपर्यंत ठीक ठरते. यातून हाती येणारे सुत्र सर्वसमावेशक असते असेही म्हणता येत नाही. कारण एकाच काळात विविध प्रवृत्तीची कांदबरी लिहिली जाते. अशा कादंबरीचा परस्परांशी असणारा अनुबंध स्पष्ट करणे कठीण असते. म्हणून विशिष्ट काळाशी सुसंगत असणारी, कादंबरीच्या परंपरेत नवीन असणारी कादंबरी ही विशिष्ट काळाचे प्रतिनिधीत्त्व करीत असते. म्हणून

जेव्हा नव्वदोत्तरी कादंबरी असे म्हटले जाते, तेव्हा विशिष्ट काळाचे प्रतिनिधीत्त्व करणाऱ्या कादंबरीचा विचार मुख्यत्वाने करणे आवश्यक ठरते.

## ग्रामीण साहित्याची संकल्पना आणि २०००

१९७७ पासून अधिकृतपणे ग्रामीण साहित्य चळवळीला प्रारंभ झाला. आज सन २०१३ मध्ये ग्रामीण साहित्याची चळवळीला ३६ वर्षे पूर्ण होत आहे. १९७७ मध्ये ग्रामीण साहित्य चळवळीची उद्दिष्टे सांगताना डॉ. आनंद यादव म्हणतात, पूर्वसुरींच्या साहित्याचे नव्याने मूल्यमापन, वर्तमान समाजाचे बदलते वास्तव, त्याविषयीचे प्रश्न, समस्या यांचे विवरण, सर्वांगीण लेखनासाठी लेखकाला कोणत्या स्वरुपाचे आत्मभान येण्याची गरज आहे त्याची मीमांसा, नव्या ग्रामीण साहित्याची दिशा काय असू शकेल त्याचा आलेख काढणे, नव्या लेखकांच्या जाणिवा अधिक समृध्द करण्यासाठी लेखन शिबीरे, समीक्षा शिबीरे, मेळावे, साहित्य संमेलने भरविणे, नव्या प्रेरणांचे साहित्य व समीक्षा प्रसिध्द करण्यासाठी माध्यमे उपलब्ध करुन देणे इत्यादी. या व अशा स्वरुपाची उद्दिष्टे समोर ठेवून ग्रामीण साहित्याची चळवळ वाटचाल करु लागली. ग्रामीण साहित्याची ही चळवळ प्रामुख्याने सामाजिक व सांस्कृतिक स्वरुपाची होती. त्या त्या समाजात निर्माण होणाऱ्या साहित्यात त्या त्या समाजाचे सर्वांगीण प्रतिबिंब पडावे, असे या चळवळीचे मुख्य सुत्र होते.

सन २००२ मध्ये ग्रामीण साहित्य संकल्पनेची मांडणी करताना डॉ. नागनाथ कोतापल्ले म्हणतात, ग्रामीण जगण्याची वेगळी रीत हे तर या संकल्पनेत गृहीतच आहे, परंतु या पलीकडेही काही आहे. आपल्या जीवनाला दुय्यमत्त्व देणाऱ्या व्यवस्थेला आजचा ग्रामीण लेखक प्रश्न विचारतो आहे. आपले जगणे विस्कटून टाकणाऱ्या व्यवस्थेच्या विरोधातसंघर्ष करायला तो सिध्द झाला आहे. आपले नेमके शत्रू कोण आहेत, याचा त्याला शोध घ्यावयाचा आहे. एकंदरीत आजच्या ग्रामीणतेच्या संकल्पनेमध्ये संस्कृतिसंघर्षाचाही समावेश करणे गरजेचे झाले आहे. ही संस्कृतिसंघर्षाची जाणीव लक्षात घेतली की, ग्रामीणता ही एक व्यापक संकल्पना आहे, हे लक्षात यायला लागते.

ग्रामीण साहित्याच्या संकल्पनेबाबत प्रारंभीच्या काळात डॉ. यादवांनी मांडलेली भूमिका आणि २००२ मध्ये डॉ. कोतापल्ले यांनी मांडलेली भूमिका यात काही बाबतीत बदल दिसतो. ही संकल्पना अधिक व्यापक झाल्याचे दिसते. या बदलाच्या स्वरुपाचा शोध १९९० नंतरच्या ग्रामीण कादंबरीच्या वाटचालीकडे पाहून घेता येईल.

## सन १९९० नंतरच्या ग्रामीण कादंबरी

ग्रामीण कादंबरीची परंपरा थेट १९०३ पर्यंत मागे नेली जाते रा. वि. टिकेकर उर्फ धनुर्धारी - मुकुंदराव पाटील - ग. ल. ठोकळ - ग. ह. पाटील इ श्री. म. माटे - र. वा. दिघे - म. भा. भोसले - द. र. कवठेकर - व्यंकटेश माडगुळकर - शंकर पाटील - द. मा. मिरासदार - आण्णाभाऊ साठे - यादव - रा. र. बोराडे - कोतापल्ले - वासुदेव मुलाटे - आनंद पाटील - श्रीराम गुदेकर - उत्तम बंडू तुपे - योगीराज वाघमारे - चंदनशिव - पुरुषोत्तम बोरकर - बा. ग. केसकर अशी एक परंपरा सांगता येते. या परंपरेतील कादंबऱ्यातून ग्रामीण जीवनात आलेल्या विविध स्थित्यंतरांचा आलेख मांडता येतो. सुरुवातीला या परंपरेतील कादंबऱ्यातून दुष्काळामुळे खेडूतांची होणारी वाताहात, शेतकऱ्याची लुबाडणूक आदी प्रश्न मांडणारी कादंबरी, र. वा. दिघे, ग. ल. ठोकळ, म. भा. भोसले, द. र. कवठेकर यांच्या कादंबऱ्यातून ग्रामीण जीवनाच्या विविध अंगाना स्पर्श करायला लागली. तिची खऱ्या अर्थाने भरभराट १९६० नंतरच्या काळात झाली. उध्दव शेळकेंची धग, शंकर पाटील यांची टारफुला, रणजित देसाई यांची माझा गाव हमीद दलवाई यांची इंधन, ना. धो. महानोर यांची गांधारी, रा. रं. बोराडे यांची पाचोळा आणि आनंद यादव यांची गोतावळा या कादंबऱ्यातून यंत्र, विज्ञान, नवी व्यवस्था यांच्यामुळे खेड्यात आलेल्या स्थित्यंतरातून निर्माण झालेल्या समस्यांचे प्रत्यंयकारी व वास्तव चित्र साकार झाले.

ग्रामीण कादंबरीला एक दिशा देण्याचे महत्त्वपुर्ण कार्य या कादंबऱ्यातून झाले. या कालखंडात यादव, बोराडे, मुलाटे, कोत्तापल्ले, योगिराज वाघमारे, आनंद पाटील, श्रीराम गुदेकर, उत्तम बंडू तुपे आदी लेखकांनी ग्रामीण साहित्य चळवळीशी बांधिलकी मानून लेखन केले. आनंद यादाव यांच्या झोंबी (१९८३), नांगरणी (१९९०), घरभिंती या आत्मचरित्रात्मक कादंबऱ्यांनी एक नवा वाङःमयप्रकार ग्रामीण साहित्यात आणला. तर नटरंग (१९८३), माऊली (१९८५), गोतावळा या कादंबऱ्यांनी ग्रामीण वास्तव्याचे विविध पैलू साकार केले. महादेव मोरे यांची झोंबड, बाबाराव मुसळे यांची हाल्या हाल्या दुधू दे, नागनाथ कोतापल्ले यांची गांधारीचे डोळे, वासुदेव मुलाटे यांची विषवृक्षाच्या मुळ्या या कादंबऱ्यांनी बदलते ग्रामीण वास्तव साकारले. पुरुषोत्तम बोरकर यांच्या मेड इन इंडिया (१९८७) या कादंबरीत पंजाबराव साहेबराव गरसोळीकर पाटील या बी. ए. झालेल्या वऱ्हाडातील खेड्यातील शहरात शिकणाऱ्या तरुणाची कहाणीतून म. गांधीच्या ग्रामसुराज्याचे स्वप्न धुळीला मिळाल्याचे चित्र साकार होते. बा. ग. केसकरांच्या वायटूळ या कादंबरीतून घर, कुटुंब की शिक्षण अशा मानसिकतेत अडकलेल्या ग्रामीण युवकाची शोकात्मिका साकार होते. अशा प्रकारचे वैविध्यपूर्ण अनुभव या

कालखंडातील ग्रामीण कादंबरीतून व्यक्त होताना दिसतात. नामदेव कांबळे यांच्या राघववेळ या कादंबरीतून वालंबी नावाच्या मातंग समाजातील स्त्रीच्या जगण्याची धडपडीतून तिच्या कुटुंबकथेबरोबरच तिच्या जातीचे गावगाड्यातील संबंध साकार होतात. राजन गवस यांच्या तणकट मधून गावातील ग्रामपंचायत, दूध डेअरी, पतसंस्था, वाढलेल्या गावठाणातील प्लॉट तसेच दलितांचे बदलते जीवनविश्व साकार होते. त्यांच्या चौडकं, भंडारभोग मधून खेड्यातील अंधश्रध्दांच्या माध्यमातून होत असलेल्या शोषणाचे एक विदारक चित्र साकार होते. तर धिंगाणा तून राजकारण व बेकार तरुणांच्या व्यथा साकार होतात. सदानंद देशमुख यांच्या तहान, बारोमास मधून ढासणाऱ्या कृषिजीवनाचे मार्मिक व विदारक चित्रण करताना कर्जाच्या डोंगराखाली पिचलेल्या शेतकऱ्याच्या पराभूत मानसिकता बदलण्यास अधिक बळ मिळाले तरच भूमिपुत्र जगू शकेल असा उपायही सुचविलेला दिसतो. विश्वास पाटील यांच्या झाडाझडती (१९९०) मधून धरणग्रस्तांचे प्रश्न, बाजीराव पाटील यांच्या भंडारवाडी, प्रतिमा इंगोले यांच्या बुढाई, बाबाराव मुसळे यांच्या पखाल (१९९५), वारुळ, किशोर सानप यांच्या भूवैकुंठ, रमेश अंधारे यांच्या पागोरा, रमेश इंगळे उत्रादकर यांच्या निशानी डावा अंगठा मधून सरकारी योजनांचा एक अन्वयार्थ लावलेला आहे, तर भारत काळे यांच्या ऐसे कुणबी भूपाळ मधून ग्रामीण परिसरातील कुटुंबसंस्था कशी विघटीत होत चालली आहे याचे चित्रण येते. बालाजी मदन इंगळे यांच्या झिम पोरी झिम (२००९) मधून महाराष्ट्र-कर्नाटक सीमा प्रदेशातील उस्मानाबाद परिसरातील ग्रामीण जीवन येते.

गणेश आवटे यांच्या भिरुड (२००७), भास्कर चंदनशिव यांच्या अंगारमाती (१९९१), आसाराम लोमटे यांच्या इडापिडा टळो (२००६) मराठवाड्यातील ग्रामीण जीवन साकार होते. शेषराव मोहिते असं जगणं तोलाचं (१९९४) मधून सावकार, दुष्काळ, भ्रष्टाचार, दलाल आणि सुस्त प्रशासन यांच्या मगरमिठीत होणारी शेतकऱ्याची पिळवणूक साकार होते. तर त्याच्या धूळपेरणी (२००१) तून सुशिक्षीत ग्रामीण तरुणाच्या जीवनातील तुटलेपण, शिक्षणव्यवस्थेतील संघर्ष त्यातील निरर्थकतेच्या पार्श्वभूमीवर आधुनिक जगातील शेतीचे वास्तव रुप साकार होते. रंगनाथ पाठारे यांच्या टोकदार सावलीचे वर्तमान तून ग्रामीण तरुणांच्या व्यथा साकार होतात, तर ताम्रपट मधून स्वातंत्र्यपूर्वोत्तर समाजजीवनातील स्थित्यंतर येते. रवींद्र शोभणे यांच्या कोंडी तून सरंजामी परंपरेतून येणारे राजकारणाच्या पार्श्वभूमीवर शेतकऱ्याची ससेहोलपट साकार होते. सरदार जाधव याच्या कोयता तून दुष्काळी परिस्थितीतील कष्टकऱ्यांचे चित्रण, मधु सावंत तिची वाटच वेगळी (१९९२), राहू केतू या कादंबरीतून मराठवाड्यातील ग्रामीण जीवनातील राजकीय वास्तव साकार होते. ही मराठवाड्यातील पहिली राजकीय कादंबरी होय.

## समारोप

अशा प्रकारचे ग्रामीण जीवनाचे वास्तव १९९० नंतरच्या कालखंडातील कादंबऱ्यातून साकार होते. अगोदरच्या कालखंडाच्या तुलनेत हे वास्तव निश्चितच बदललेले दिसते. ते अधिक टोकदार झाल्याचे दिसते. या वास्तवात ग्रामीण माणसांचे अंतरंग, त्यांच्या वृत्ती - प्रवृत्ती, कौटुंबिक नात्यातील अनेक ताण-तणाव, होऊ घातलेले आणि झालेले परिवर्तन साकार होते. तसेच शेतकऱ्यांच्या जीवनातील दुःख, अगतिकता, लाचारी, स्त्रीयांचे दुःख येते, गावगाड्यातील दलित-दलितेत्तर यांच्यातील ताणतणाव अनुभवास मिळतात. त्याच बरोबरीने ग्रामीण जीवनातील प्रश्न, राजकारण, अपेक्षाभंग यांचे चित्रण येते. काळानुरुप बदललेल्या ग्रामीण जीवनाचे चित्र या कादंबऱ्यातून साकार होत असताना ते आशयदृष्ट्या संपन्न होत गेलेले दिसते.